निलंबन कालावधीचा निर्णय घेणे बाबत ...
कै. श्री.प्रशांत दिनकर बारगजे, तत्कालीन कनिष्ठ सहाय्यक, लघु पाटबंधारे विभाग, जि.प.अहिल्यानगर

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग-१
जि.प.आदेश जा.क्र.साप्रवि-१/अस्था-३/२८६४७२६/१२८५/२०२५
अहिल्यानगर दिनांक. स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

वाचा:-१. इकडील निलंबन आदेश क्र.साप्रवि१/आस्था-३/१११४/२०२० दिनांक ०९/१०/२०२०
२. इकडील दोषारोप पत्र क्रं.साप्रवि-१/आस्था-३/१७६/२०२१ दिनांक ०१/०३/२०२१
३. दोषारोपाचे अनुषंगाने तुमचा खुलासा दिनांक ३०/०३/२०२१
४. इकडील अंतिम कारणे दाखवा नोटिस क्रं.साप्रवि-१/आस्था-३/३४३/२१ दि.४/१/२१
५. जिल्हा जलसंधारण अधिकारी लघु पाटबंधारे विभाग अहमदनगर यांचेकडील पत्र क्र.ल.पा./आस्था-१/३४१/२०२१ दि.२८/५/२०२१ अन्वये श्री.बारगजे यांचा खुलासा प्राप्त दिनांक २४/५/२०२१
६. इकडील आदेश जा.क्र.साप्रवि१/आस्था-३/४२०/२०२१ दिनांक २१/०६/२०२१
७. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढुन टाकणे ह्या काळातील प्रदाने) नियम १९८१ नियम ७२ (७)

कै. श्री प्रशांत दिनकर बारगजे, हे कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) या पदावर लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर येथे कार्यरत असताना विनापरवानगी कार्यालयीन कामी गैरहजर राहिलेने त्यांना संदर्भ क्रमांक १ च्या आदेशान्वये सेवा निलंबित करणेत आलेले होते. संदर्भ क्रमांक २ अन्वये दोषारोप ज्ञापन बजावण्यात आले होते. संदर्भ क्रमांक ३ अन्वये कै. श्री प्रशांत दिनकर बारगजे यांनी दोषारोप मान्य केलेने कै. श्री प्रशांत दिनकर बारगजे, यांना उक्त नमुद गैरवर्तनाबाबत संदर्भ क्रमांक ४ अन्वये तीन वेतनवाढी कायमस्वरुपी थोपविणेची शिक्षा करणेकामी अंतिम कारणे दाखवा नोटीस देणेत आलेली होती.

संदर्भ क्रमांक ५ नुसार कै. श्री प्रशांत दिनकर बारगजे, यांनी अंतिम कारणे दाखवा नोटीशीस खुलासा सादर केला. कै. श्री प्रशांत दिनकर बारगजे यांचा खुलासा अमान्य करणेत येवुन त्यांनी कार्यालयीन कामी अनाधिकृत गैरहजर राहिलेने त्यांची पुढील वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवाढीवर परिणाम होईल अशा रितीने तीन वर्षा करिता थोपविण्याची शिक्षा संदर्भ क्रमांक ६ च्या आदेशाव्दारे अंतिम करण्यात आली.

कै. श्री प्रशांत दिनकर बारगजे, तत्कालीन कनिष्ठ सहाय्यक, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचा दिनांक २८/१०/२०२० ते दिनांक २८/०५/२०२१ अखेर २१३ दिवस निलंबन कालावधीचा निर्णय घेणेची बाब विचाराधीन होती.

कै. श्री प्रशांत दिनकर बारगजे, तत्कालीन कनिष्ठ सहाय्यक, लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर हे दिनांक ०१/०४/२०२४ रोजी मयत झालेले आहे. तरी कै. श्री प्रशांत दिनकर बारगजे, यांचा निलंबन कालावधीचा निर्णय घेणे आवश्यक आहे. तरी सदर प्रकरणी कै. श्री प्रशांत दिनकर बारगजे, यांना त्यांची पुढील वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवाढीवर परिणाम होईल अशा रितीने तीन वर्षा करिता थोपविण्याची शिक्षा करणेत आलेली असलेने त्यांचे निलंबन समर्थनीय ठरत आहे. सबब, मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर, महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढुन टाकणे ह्या काळातील प्रदाने) नियम १९८१ च्या नियम ७२ पोटनियम ७ च्या तरतुदीस अधिन राहुन कै. श्री प्रशांत दिनकर बारगजे, तत्कालीन कनिष्ठ सहाय्यक, लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचा दिनांक २८/१०/२०२० ते दिनांक २८/०५/२०२१ अखेर २१३ दिवस कालावधी हा सेवेच्या सर्व प्रयोजनार्थ कामावर व्यतीत न केलेला कालावधी धरण्यात येत आहे.

सदर आदेशाची नोंद कै. श्री प्रशांत दिनकर बारगजे, कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती पारनेर यांच्या मुळ सेवा पुस्तकात घेणेत यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक ..202512270402110.. असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 27-12-2025 11:45:29
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

गट विकास अधिकारी पंचायत समिती पारनेर

२/- सदरचा आदेश कै. श्री प्रशांत दिनकर बारगजे, कनिष्ठ सहाय्यक यांचे वारसदार यांना बजावणेत येऊन त्यांची दिनांकीत पोहोच या कार्यालयास सादर करावी. तसेच त्यांचे कुटुंब निवृत्ती वेतनाबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

स्वाक्षरी/--
(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर